31 MAR 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रत्येक घडामोडीचा विश्लेषणात्मक अभ्यास करा

## खासदार धनंजय महाडिक यांचा विद्यार्थ्यांना सल्ला : शिवाजी विद्यापीठात १४ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजाच्या तळागाळातील घटकांच्या समस्यांची जाणीव असणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असताना असे प्रश्न समजून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करणं आवश्यक असते. तसंच या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वस्तुनिष्ठ माहिती मिळवून संसदेत पाठपुरावा करावा लागतो. तसेच विद्यार्थ्यांना जर स्वत:ला देशपातळीवर सिद्ध करायचे असेल, तर त्यांनी समाजातील प्रत्येक घडामोडीचा विश्लेषणात्मक अभ्यास करुन, त्याचा तपशील समजावून घ्यावा, असे प्रतिपादन खासदार धनंजय महाडिक यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आज झालेल्या, राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत ते बोलत होते.

केंद्र सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयामार्फत देशातील विविध विद्यापीठांमध्ये १४ वी राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा घेण्यात आली. आज कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात ही स्पर्धा पार पडली. विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातून एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. खासदार धनंजय महाडिक, प्र-कुलगुरु डी. टी. शिर्के, मिनिस्ट्री ऑफ पार्लमेंटचे श्री. राजन, एम.आय.टी. चे प्रोफेसर सुधीर गव्हाणे, डॉ. प्रल्हाद माने यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. खासदार धनंजय महाडिक यांनी, संसदीय कामकाजाविषयी माहिती दिली. एखादा प्रश्न मांडत असताना,



त्याबाबत सखोल आणि तंतोतंत माहिती आपल्याकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपण उपस्थित केलेल्या प्रश्नावर टीका करणाऱ्यांना देखील या प्रश्नाचे गांभीर्य पटवून सांगता येणे महत्वाचे आहे. संसदेची कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी, लोकसभेचे कामकाज अभ्यासणे महत्वाचे आहे, असे त्यांनी नमूद केले. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील समस्या मांडण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला. तोंडी तलाकबंदी, सर्जिकल स्ट्राईक, आतंकवाद, गोवंश हत्याबंदी, शेतकरी आत्महत्या, नोटाबंदी, जीएसटी, हिंदी प्रचार आणि प्रसार, मानवी तस्करी, कुपोषण, नोकर भरती, बँक भ्रष्टाचार, नीरव मोदी, विजय मल्ल्या, भीमा कोरेगाव या घटनेबाबत अभ्यासात्मक चर्चा करण्यात आली. या स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट मांडणी केल्याबद्दल निकिता पिसे, अभिजीत ताम्हणकर, विनायक साळुंखे, गौरी काटे, आकांक्षा पाटील, श्रेयस मोहिते यांना गौरवण्यात आलं. यावेळी एस. एस. सुहार, आर. एस. पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

31 MAR 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity forms committee for issues related to summer exams

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has *formed a committee for the* on-going summer examination across the division to address various exam-related issues.

In a circular, dated March 21, the exam department said the committee comprises deputy registrars and assistant registrars.

"The special committee will work for resolving queries of students and colleges ahead of regular semester examinations that have commenced from March 22 across Kolhapur, Sangli and Satara districts. The committee members have been assigned with a particular schedule during the examination period, so as to share the exam load," the circular said.

According to a SUK official, over 2.5 lakh students will appear for the March semester examination that will see over 500 examinations for different courses. The examinations will conclude by May-end.

File photo



The exam department said the committee comprises deputy registrars and assistant registrars

"These committees will exclusively look after the nature of complaints and solutions offered. The committee members are from the department of examination only," said an official from the exam department of SUK.

"The said initiative is in operation from March 2016 and it has proved quite useful for the exam department. The assigned officials have been asked to keep a record of the calls, so as to find out what kind of queries are being faced by the students during the examination. The same kind of arrangement was done in the last years semester exam too," he added.

The department has made it compulsory for members of the committee to be present an hour before the commencement of the exam and leave half-an-hour after the examination gets over.

## Contact Nos.

- G R Palse: 0231-2609101/ 7972612772
- N J Bansode: 0231-2609491/8983327111
- A M Akulwar: 0231-2609486/9665749345

> These committees will exclusively look after the nature of complaints and solutions offered. The committee members are from the department of examination only
>
> **— An exam dept official**

The circular said that assistant registrar G R Palse will be looking after the queries regarding exam schedule, exam papers and discrepancies in the exam. Other officials will be coordinating with the nature of queries.

The SUK has a total of 283 affiliated colleges across the Sangli, Satara and Kolhapur districts, with over 2.5 lakh students imparting education in over 30 courses.

31 MAR 2018 लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हरितक्रांती होण्यामध्ये जैवतंत्रज्ञानाचे योगदान

## डॉ. माणिकराव साळुंखे यांचे मत

**कराड, वार्ताहर**

**जैवशास्त्र व** पर्यावरणपूरक रसायनशास्त्र यामधील प्रगत संशोधन आजच्या रासायनिक पदार्थांच्या वापरामुळे होणाऱ्या नुकसानीस पायबंद घालेल, असा ठाम विश्वास भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी व्यक्त केला. हरितक्रांतीच्या पाठिमागे सुद्धा जैवतंत्रज्ञानाचे योगदान असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे कराड येथे आयोजित 'इंटरनॅशनल कॉन्सफरन्स ऑन अॅडव्हान्सड् रीसर्च इन लाईफ सायन्सेस' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. साळुंखे म्हणाले, कर्मवीरअण्णांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून कार्यरत राहिलेले (कै.) डॉ.पतंगराव कदम यांचेही कार्य महत्त्वपूर्ण होते. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात उद्योगधंद्यांना महत्त्व आले आहे. पण त्याचबरोबर समाजाच्या निकोप वाढीसाठी या तंत्रज्ञानाने प्रयत्नशील रहावे. नवोदित संशोधकांनी समाजाशी निगडित अशा संशोधनात प्रगती करावी.

अध्यक्षीय मनोगतात कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले, की सेंद्रिय शेतीचे आजच्याघडीचे महत्त्व ओळखून त्यामध्ये संशोधन होणे गरजेचे आहे. यासाठी संशोधकांनी संशोधन करत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत.

संशोधकांनी पर्यावरण, शेती आदी क्षेत्रामधील आव्हानांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करावा. धूम्रपान, मद्यपानामुळे शारीरिक आजारांना तरूण वर्ग बळी पडत आहेत. आरोग्य, शिक्षण, प्रदूषण, अन्नधान्य उत्पादनातील घट यांसह देशापुढे अनेक आव्हाने आहेत. या सर्वांना तोंड देण्याची संशोधक विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. प्रास्ताविक कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी केले. आझाद विद्यापीठ इराणच्या सारा कामयाब, प्रा. डॉ. बी.जे.पाटील, प्रा.डॉ.आर.डी.बोरडे, प्रा.डॉ.ए.यू.सुतार, व्ही.जे.पाटील, उपप्राचार्य डॉ.एस.आर.सावंत, प्रा.वंदना किशोर व प्रा.डॉ.अश्विनी तातूगडे यांची उपस्थिती होती. चर्चासत्राची भूमिका प्रा.व्ही.एम.घोरपडे यांनी विषद केली. या परिषदेस चारशेहून अधिक प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले होते.